बीड । शुक्रवार
२५.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : २५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# 300 नक्षलवाद्यांना 4000 जवानांनी घेरलं

## 48 तासांपासून चकमक सुरु, आतापर्यंतचं सर्वात मोठं ऑपरेशन



**वृत्तसंस्था**

छत्तीसगडच्या बीजापूर आणि तेलंगणा सीमेवर सुरक्षादलाच्या जवानांनी नक्षलवाद्यांच्या विरोधात मोठं ऑपरेशन लॉन्च केलं आहे. या ऑपरेशनमध्ये ४००० हून अधिक जवान सहभागी झाले आहेत. या जवानांनी ३०० हून अधिक नक्षलवाद्यांना घेरतं आहे. त्यात नक्षली लीडर हिडमा, देवा, सुधाकर यांचा समावेश आहे. जवानांनी करागेट्टा, नाडंपल्ली, पुजारी कांकेरच्या डोंगरावरील नक्षलवाद्यांना जवानांनी घेरलं आहे.

गेल्या ४८ तासांपासून ऑपरेशन सुरु आहे. दोन्ही बाजूंकडून अधूनमधून गोळीबार होत आहे. या ऑपरेशनमध्ये तेलंगणा, महाराष्ट्र, छत्तीसगड या तिन्ही राज्याचे पोलीस सहभागी झाले आहेत. या भागात मोठ्या प्रमाणात नक्षलवाद्यांचे वास्तव्य आहे. त्यामुळे जवान देखील सावधपणे पावले उचलत आहेत.

या भागात नक्षलवाद्यांच्या बटालियन नंबर १ आणि २ सहित नक्षलवाद्यांच्या अन्य कंपन्या देखील पोहोचल्या आहेत. सूर्य आग ओकत असताना जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरु आहे. ऑपरेशनदरम्यान ड्रोनच्या माध्यमातून नजर ठेवली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, जवानांनी एका आठवड्याचं रेशन ऑपरेशनसाठी जवळ ठेवलं आहे.

छत्तीसगड सीमेवरील ऑपरेशनला तेलंगणातून मॉनिटर केलं जात आहे. आयजी सुंदरराज पी आणि बीजापूर एसपी जितेंद्र यादव नजर ठेवून आहेत. ऑपरेशनमध्ये अनेक हायटेक वस्तूंचा वापर करण्यात येणार आहे. राज्यातील गृहमंत्र्यांचं संपूर्ण ऑपरेशनवर लक्ष आहे. तिन्ही राज्यातील समन्वय समितीने एकत्र ऑपरेशन लॉन्च केलं आहे. सुरक्षा दलाने नक्षलवाद्यांचं नेटवर्क तोडलं आहे. त्यामुळे नक्षलवाद्यांसमोर रेशन आणि मेडिकलच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

चकमकीदरम्यान सुरक्षा दलाला मोठं यश मिळत आहे. दुसरीकडे नक्षलवाद्यांनी चारी बाजूला आयइडी प्लाँट केला आहे. याबाबत ग्रामस्थांनाही सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या जवानांकडून नक्षलवाद्यांवर मोठा प्रहार केला जात आहे. या ऑपरेशनबाबत पोलिसांकडून कोणत्याही प्रकारचं अधिकृत भाष्य करण्यात आलेलं नाही.

# बंगाली बाबू बनणार पोलिसांचा पाहुणा

## फसवणूक प्रकरणी पोलिसांचा तपास सुरु; करोडो रुपयांची स्कीम डब्यात जाणार ? तीस लाखांचा तिढा सुटणार का ?

**बीड । प्रतिनिधी**

धमाका ऑफरच्या नावाखाली बीड शहरातील अनेक सामान्य नागरिकांना मोठे स्वप्न दाखवणाऱ्या एका बंगाली बाबूचा भांडाफोड झाला असून तीस लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणी एका ज्वेलरी चालकाने शहर पोलीस ठाण्यात या बंगाली बाबूच्या विरोधात तक्रार अर्ज दाखल केला आहे. मागील दोन महिन्यापूर्वी दाखल असलेल्या या तक्रारी अर्जाचा तपास पोलीस करत असून उशिरा का होईना या बंगाली बाबूच्या दुकानावर पोलीस पोहोचले असून बंगाली बाबू भेटून आला नाही. तपासाची चक्रे वेगात फिरत असून या बंगाली बाबू वर लवकरच फसवणूक प्रकरणी गुन्हा नोंद होण्याची शक्यता असून शहरात बुलेट वाटणारा हा बंगाली बाबू पोलिसांचा काही दिवसात पाहुणा होणार आहे. बीड जिल्ह्यात बुलेट राजा म्हणून ओळख निर्माण करणारा बंगाली बाबू च्या पाठीमागे साडेसाती लागलेली आहे.



एका व्यवहारातून तीस लाख रुपयांचा एक संबंधित ज्वेलरी चालकाला दिला होता ही रक्कम बँकेतून वटलेली नसल्याने संबंधित ज्वेलरी चालकाने शहर पोलीस ठाण्यात या बुलेट राजा विरोधात तक्रार अर्ज दाखल केला होता. दोन महिन्याच्या कालावधीनंतर या बंगाली बाबूची चौकशी सुरू झाली आहे. पोलिसाचे एक पथक आज शहरातील त्याच्या आलिशान दुकानावर पोहोचले मात्र त्या ठिकाणी तो आढळून आला नाही. चौकशीसाठी पोलीस ठाण्यात हजर राहण्याचे फर्मान पोलिसांनी दिले असून संबंधित बुलेट राजा जर पोलिसात हजर झाला नाही तर तक्रारी अर्ज एफ आय आर मध्ये नोंद होत फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद होण्याची तयारी पोलीस विभागांनी चालवली आहे. एका तक्रारी अर्जाला दोन महिन्यापासून सुरक्षित ठेवण्यात आले यामागे पोलीस विभागातील तो पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# विवेक जॉन्सन यांनी स्विकारला बीड जिल्हाधिकारी पदाचा पदभार



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयाचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जान्सन यांनी आज पदभार स्विकारला. श्री. जॉन्सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. येथे बदलून येण्यापूर्वी ते चंद्रपूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. अभियंता पदवी नंतर ते प्रशासकीय सेवेत आहेत. त्यांनी परिविक्षाधिन कालावधीत येथील माजलगाव नगर परिषदेत मुख्य ▶▶ उर्वरित पान २ वर

# मध्यप्रदेश आणि मुंबईतील घटनेचा जैन बांधवांकडून जाहीर निषेध

## जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींवर तर जैन मंदिर पाडणाऱ्या अधिकार्यांवर कडक कारवाई करा ; बीडमधील जैन बांधवांची जिल्हाधिकार्यांमार्फत: शासनाकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मध्यप्रदेश आणि मुंबईतील घटनेचा बीडमधील जैन बांधवांकडून जाहीर निषेध करण्यात आला आहे. त्याअनुषंगानेच मध्यप्रदेश येथे जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींवर आणि मुंबई येथील जैन मंदिर पाडणार्या अधिकार्यांवर कडक कारवाई करा तसेच पाडलेले मंदिर पुन्हा उभे करा, अशी ▶▶ उर्वरित पान २ वर



# धनंजय मुंडे यांच्या मेहुण्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल

**मिरज । प्रतिनिधी**

बेडग (ता. मिरज) येथे शेत जमिनीचा ताबा घेण्यासाठी मारहाण, दमदाटी करून शेतातील झोपडी पाडल्याबद्दल माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे मेहुणे व युवा राष्ट्रवादीचे माजी पदाधिकारी जितेंद्र ऊर्फ बाळासाहेब ओमासे यांच्यासह पाच जणांविरुद्ध मिरज ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी अद्याप कुणालाही अटक करण्यात आलेली नसल्याचे



पोलिस उपनिरीक्षक दीपक माने यांनी सांगितले.

याबाबत राहुल सुरेश ओमासे (वय २४, रा. बेडग ) यांनी फिर्याद दिली आहे. मुंडे यांचे मेहुणे जितेंद्र ऊर्फ बाळासाहेब ओमासे, रघु नागरगोजे, नेताजी ओमासे, मल्हारी खाडे, स्वप्निल साबळे (सर्व रा. बेडग ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

याबाबत माहिती अशी की, मुंडे यांचे मेहुणे जितेंद्र ओमासे व राहुल ओमासे यांच्यात बेडग येथील दीड एकर शेतजमिनीच्या मालकीवरून वाद आहे. याबाबत न्यायालयात खटला दाखल करण्यात आला होता. न्यायालयाकडून आदेश मिळाल्याचा दावा करीत दि. २२ रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर

# परळी हुण बीड लैई भारी ! परळीत येऊण चोरणीं नी केली धाडसी चोरी

## शिवकथे मध्ये ४.५ तोळे सोन्याच्या दागीन्यावर मारला होता हात परंतु बीड पोलीस निघाले चोरणींचे बाप !

**बीड । प्रतिनिधी**

परळी येथील शिवकचेच्या गर्दीचा फयदा घेवून गंठण चोरी करणाऱ्या महिला घेतल्या ताब्यात साडेचार तोळे सोन्याचे दागिने केले जप्त. दिनांक २६/११/२०२४ रोजी फिर्यादी नामे उमाबाई उत्तमराव मिटकर वय ६६ वर्ष रा. विदयानगर, परळी यांनी पोलीस स्टेशन, परळी शहर येथे येवुन फिर्याद दिली की, दिनांक १३/११/२०२४ रोजी हालगे गार्डन परळी येथे शिव कथेचा कार्यक्रम असल्याने दुपारी ०२.०० वा. दरम्यान महाप्रसादाचा कार्यक्रम संपल्यानंतर महाप्रसाद वाटप चालु झाले महाप्रसादास खुप गर्दी होती. सदर गदर्दीचा कोणीतरी अज्ञात महिलेने फायदा घेवुन फिर्यादीच्या गळ्यात हात घालुन ।) दोन तोळयाचे सोन्याचे गंठण जुने वापरते कि. अं. ९०,०००/- चोरुन घेतले तसेच कमलाबाई बांगड हिचे गळयातील सोन्याची चैन अज्ञात महिलेने गर्दीचा फायदा घेवुन चोरुन घेवुन गेले. वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# धारुर तालुक्यात पुन्हा चोरी;चोरीच्या घटना रोखण्यात पोलीस प्रशासन अपयशी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुका व शहरात चोरांनी अक्षरशः लूट चालवली आहे महिनाभरापासून चोरीच्या घटना सुरू आहेत हे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही नागरिकाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे दिनांक २० एप्रिल रोजी धारूर शहरातील मुख्याध्यापक टोणगे यांना शस्त्राचा धाक दाखवून चोरी केली प्रतिकार करत असताना त्यांच्या हातावर कोयत्याचा वार झाला त्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला परंतु अजूनही चोर सापडले नाहीत तोवरच आता धारूर तालुक्यातील आसरडोह येथे वयोवृद्धास मारहाण करून घरातील रोख व तीन तोळे सोने चोरी झाल्याची घटना घडलीची माहिती मिळाली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर



# कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय

## केजमधील महालक्ष्मी कला केंद्रावर पोलिसांचा छापा, १० महिलांची सुटका

**केज । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी समोर आली होती. त्यानंतर गुन्हेगारीच्या अनेक घटना उघडकीस आल्या होत्या. त्यात आता केजमधील एका कला केंद्रामध्ये वेश्या व्यवसाय सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. पोलिसांनी या कला केंद्रावर २३ एप्रिलच्या मध्यरात्री धाड टाकली. या कारवाईत १० महिलांची सुटका करण्यात आली. याप्रकरणी तिघांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या कला केंद्रावर ठाकरे गटाच्या बड्या नेत्याचा वरदहस्त असल्याचा आरोप केला जातोय, अशी तक्रार पोलिसांत दिली गेली होती. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत महालक्ष्मी कला ▶▶ उर्वरित पान २ वर

# देशमुख हत्या प्रकरणात आमचा कुठेही सहभाग नाही



## ● वाल्मीक कराडच्या वकिलाचा कोर्टात दावा ; ७ मे रोजी पुढील सुनावणी

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज पुन्हा बीड कोर्टात सुनावणी झाली. या सुनावणीत या हत्याकांडातील मुख्य आरोपी असणाऱ्या वाल्मीक कराडच्या वकिलाने आपल्या अशिलाचा या प्रकरणात सकृतदर्शनी कुठेही सहभाग दिसून येत नसल्याचा दावा केला. त्यानंतर कोर्टाने या बहुचर्चित खटल्याची सुनावणी ७ मे पर्यंत तहकूब केली. पुढील सुनावणीला विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम स्वतः उपस्थित राहणार आहेत.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली होती. या प्रकरणात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू । वाल्मीक कराडसह अन्य काही आरोपींवर बीड कोर्टात खटला सुरू आहे. या खटल्याची आज सुनावणी झाली. त्यात वाल्मीक कराड व विष्णू चाटे या दोघांनी दाखल केलेल्या डिस्चार्ज अर्जावर सरकारी पक्षाने आपली बाजू मांडली. या प्रकरणी मूळ फिर्यादीचा जबाब मागवण्यात आला आहे. पण तो अद्याप सादर झाला नाही. त्यामुळे कोर्टाने या प्रकरणाची ▶▶ उर्वरित पान २ वर



# आम्ही आमच्या टिकल्या काढून फेकल्या अन् अल्लाहू अकबर म्हणायला लागलो

## गणबोटेंच्या पत्नीने पवारांना सांगितला अंगावर काटा आणणारा अनुभव

काश्मीर खोऱ्यातील पहलगाममध्ये मंगळवारी दुपारी पर्यटक निसर्गाचा आनंद घेत असतानाच अचानक गोळीबाराचा आवाज आला आणि हे खोरं किंकाळ्यांनी भरून गेलं. निरपराध पर्यटकांना घेरून, त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या हल्ल्यात २६ पेक्षा जास्त लोक ठार झाले असून त्यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. या नृशंस हल्ल्यात बळी पडलेल्यांपैकी एक म्हणजे पुण्यातील कौस्तुभ गनबोटे. कुटुंब आणि मित्रासह काश्मीर फिरायला गेलेले कौस्तुभ आणि त्यांचा मित्र संतोष जगदाळे या दोघांनाही दहशतवाद्यांनी गोळी मारून ठार केलं. जगदाळे आणि कौस्तुभ गनबोटे यांचा मृतदेह पुण्यातील निवासस्थानी आणण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी गनबोटे यांच्या घरी जाऊन त्यांचे अंत्यदर्शन घेतलं. त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केलं. त्यावेळी कौस्तुभ यांच्या पत्नीने शरद पवार यांच्या समोर दहशतवागी हल्ल्याचा भयानक अनुभव सांगितला. आपल्या पतीची आपल्याच डोळ्यांसमोर हत्या झाली हे सांगताना त्यांना शब्दच फुटत नव्हते. तिथे नेमकं काय घडलं हे त्यांच्या तोंडून ऐकताना सगळ्यांच्यांच अंगावर काटा आला. दहशतवाद्यांच्या क्रूरपणामुळे गणबोटे यांच्या घरातील आधार हरवला, सर्वांच्या हुंदक्यांनी तो परिसर अक्षरश: सुन्न झाला होता. शरद पवार यांनी गणबोटे कुटुंबियाची भेट घेऊन त्यांच सांत्वन केलं. सर्व घटनाक्रम जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नीने शरद पवार



यांच्या समोर अंगावर काटा आणणारा अनुभव सांगितला. आम्ही पहलागाम ला फिरायला गेलो होतो, तेवढ्यात तिथे हे बंदुकधार दहशतवादी आले. माझ्यासमोर माझ्या पतीला गोळ्या घातल्या गेल्या. आम्हाला अजान म्हणा असं सांगण्यात आलं होतं. ते ऐकून तिथं असलेल्या सगळ्या महिलांनी मोठ्या मोठ्या अजान म्हणायला सुरूवात केली, पण अतिरेक्यांनी तिथे उभ्या असलेल्या सगळ्या पुरूषांना मारू टाकलं. आम च्या देखतंच त्यांना गोळ्या घातल्या.

माझे मिस्टर तिथे उभे होते, त्यांचा मित्र बाजूला होता, त्यालाही पुढे बोलावलून घेतलं आणि विचारलं 'अजान पढता है क्या, पढता है क्या कुछ?' त्यांच बोलणं ऐकून आम्ही आमच्या टिकल्या काढून फेकल्या आणि आम्ही सगळे अल्लाह हू अकबर म्हणायला लागलो, पण तरीही त्यांनी,सर्वांना मारून टाकलं असं गणबोटे यांच्या पत्नीने सांगितलं. तिथे गेटवर एक मुस्लिम होता तो म्हणत होता तुम्ही कशाला निरपराध लोकांना मारता त्यांनी काय चुकी केली आहे? असं विचारलं. दहशतवाद्यांनी त्याला सुद्धा पुढे बोलावलं आणि गोळ्या घातल्या, असं सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले होते.

ते गेल्यावर आम्ही तिथून पळत सुटलो, आम्ही तिथं घोड्यावर बसून गेलो तरी आम्हाला भीती वाटत होती. खाली येताना आमचे गुडघ्यापर्यंतचे पाय चिखलात रुतत होते, पण आम्ही पळत सुटलो तिकडून कसेबसे. पण आमचे घोडेवाले खूप मुस्लिम होते, पण ते खूप चांगले होते. हल्ला झाल्यानंतर ते आम्हाला घ्यायला आले परत, आम्ही जो ड्रायव्हर केला होता, त्यानेही आम्हाला शेवटपर्यंत साथ दिली. तो पण ढसाढसा रडला. गणबोटे यांच्या पत्नीचे हे शब्द ऐकून उपस्थितांच्या डोळ्यातील पाणी खळत नव्हतं.

### महाराष्ट्रातील मृतांची नावे -

१) अतुल मोने – डोंबिवली, २) संजय लेले – डोंबिवली, ३) हेमंत जोशी– डोंबिवली, ४) संतोष जगदाळे– पुणे, ५) कौस्तुभ गणबोटे– पुणे, ६) दिलीप देसले– पनवेल

# आता पाकडे सांगतील का इथे कोण येणार? काश्मीरच्या महिलेने टराटरा फाडला बुरखा

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशात तणाव वाढला आहे. पेहेलगाम हल्ल्यानंतर भारत शांत बसणार नाही, हे स्पष्ट असतानाच काश्मीरमधील लोकही आता संतापले आहेत. एका महिलेने तर पाकिस्तानचा बुरखा टराटरा फाडला आहे. पाकिस्तानी लष्कर आणि तेथील सरकारला जम्मू–काश्मीरची जनता आपलीच आहे, असे वाटते. पहलगामसारखी भ्याड घटना घडवून आणून तो काश्मिरींच्या हृदयात स्थान निर्माण करेल, असंही त्यांना वाटतं. पण पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर ज्या प्रकारे तेथील महिला, वृद्ध आणि तरुणांनी पाकिस्तानला आव्हान देण्यास सुरुवात केली आहे, त्यावरून पाकिस्तानी लष्कर आणि तेथील सरकारला धक्क्यांवर धक्के बसत आहेत.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानने संपूर्ण देशातूनच नव्हे तर जम्मू–काश्मीरमधूनही आव्हान देण्यास सुरुवात केली आहे. या



दहशतवादी हल्ल्यानंतर एका काश्मिरी महिलेने पाकिस्तानला आव्हान देत म्हटले आहे की, ''यावेळी सर्व जण एक आहोत. इथल्या कोणाचंही वागणं पाहून कोण आपलं आणि कोण अनोळखी असं वाटायचं. पण, आता तसं नाही. कोणत्याही पर्यटकाने घाबरून जाण्याची गरज नाही.''

काश्मिरी महिलेने पाकिस्तानी लष्कर आणि सरकारला चांगलंच सुनावलं. ती महिला म्हणाली की, ''आम्ही निवारे उभे करून तुम्हा लोकांपैकी एकाला खाऊ घालू. पण तुम्ही (पाकिस्तान) स्वतःच तुमच्याच भूमीवर बाहेरचे आहात. पाकिस्तान निर्णय घेणार नाही. तो कोणता हुकूमशहा बनत चालला आहे का? आता पाकिस्तान आम्हाला काश्मीरमध्ये कसे राहायचे हे शिकवेल का?'' असे प्रश्न विचारून या महिलेने पाकिस्तानला चांगलं सुनावलं.

काश्मिरी महिलेने विचारले की, ''काश्मीरमध्ये कसे राहायचे? काश्मीरमध्ये कोण येणार? आणि काश्मीरला कोण जाणार? हे पाकिस्तान ठरवणार का? पाकिस्तान हा हुकूमशहा नाही. तो आपला हुकूम कसा बजावू शकतो. पाकिस्तानने आपल्याच देशात हुकूमशाही चालवली पाहिजे. तसेच हा भारतापासून वेगळा देश आहे. पाकिस्तानला लाज वाटत नाही. ते हिंसक कृत्ये करतात. लष्कर–ए–तोयबा, हिजबुल मुजाहिद्दीन असो किंवा त्यांची संघटना कोणीही असो, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांशी आमचा काहीही संबंध नाही.''

काश्मिरी महिलेने पाकिस्तानी लष्कर, पाकिस्तानी सरकार आणि तेथील दहशतवाद्यांना स्पष्ट संदेश देताना म्हटले आहे की, ''इस्लामच्या नावाखाली ते स्वत:ची संघटना स्थापन करतात जेणेकरून त्यांना आमचा पाठिंबा मिळू शकेल, असं त्यांना वाटतं. कोणताही देश किंवा मुस्लीम समाज त्यांना पाठिंबा देईल, असं वाटणच मोठी चूक आहे.''

पान १/४ वरून पुढे...

## बंगाली बाबू...

कर्मचारी कोण असाही प्रश्न उपस्थित होत असून बीड शहरातील नागरिकांना आर्थिक फटका देण्याची तयारी करणारा बंगाली बाबू पोलिसांना सापडत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या बंगाली बाबू विरोधात लवकरच गुन्हा नोंद होत अटक होण्याची शक्यता असल्याने त्याच्यावर विश्वास ठेवून हजारो लोकांनी लावलेली रक्कम पाण्यात जाईल का ?

शहर पोलीस दोन महिन्यापासून फक्त तपास करत आहे – दोन महिन्यापूर्वी शहर पोलीस ठाण्यात या बंगाली बाबू विरोधात फसवणूक केल्याप्रकरणी अर्ज दाखल करण्यात आला होता. दोन महिन्यापासून पोलीस विभागातील कर्मचारी या तपासी अर्जाकडे दुर्लक्ष करत होते का ? बंगाली बाबुला नेमका कोणाचा वरदहस्त आहे साधारण अर्ज आल्यानंतर तात्काळ संबंधित व्यक्तीला पोलीस ठाण्यात बोलवले जाते मात्र दोन महिन्यापासून अर्ज पोलीस ठाण्यात असून बंगाली बाबूकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. पोलीस यंत्रणा जागी झाली असून बंगाली बाबूकडे चुकीसाठी पोलीस कर्मचारी गेले असल्याची माहिती आहे. मात्र पुढे काय झाले हे गुलदस्त्यात असून पोलीस विभागाला एवढे दिवस चौकशी करण्यासाठी लागतात मग एफ आय आर करण्यासाठी किती दिवस लागणार.

पुढील महिन्यात दीड कोटीचा सट्टा – या बंगाली बाबूकडे अनेक स्कीम असून याचाच एक भाग म्हणून पुढील महिन्यात तब्बल दीड कोटी रुपयांचा प्लॅन अमलात येणार असून या मध्ये बीड शहरातील अनेक नागरिकांचा सहभाग आहे. ही स्कीम पूर्णत्व होईल का यासह शहरातील नागरिकांना घराचे स्वप्न दाखवणारे बंगाली बाबू नागरिकांना चुना लावतील का असाही प्रश्न उपस्थित होत असून तपासकामी बंगाली बाबू दोषी आढळल्यास पोलीस गुन्हा नोंद करून अटक करतील का नसता बीड शहराला पुन्हा एका स्कीम मुळे आर्थिक संकटात उडणाऱ्या व्यक्तीची पाठ राखण केली जाईल.

## विवेक जॉन्सन...

कार्यकारी अधिकारी पदावर काम केलेले आहे. त्यांनी पदभार स्विकारल्यावर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी त्यांचे प्रशासनातर्फे स्वागत केले. यावेळी महसूल विभागाचे अधिकारी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच इतरांची उपस्थिती होती.

अल्पपरिचय– पलक्कड येथील एनएसएस महाविद्यालयातून यांत्रिकी अभियंता परिक्षा उत्तीर्ण

२०१६ साली भारतीय महसूल सेवा (आयआरएस) व नंतर २०१८ साली भारतीय प्रशासन सेवेत रुजू

स्मार्ट आरोग्य केंद्र उभारणीत एकूण ३२ आरोग्य केंद्र अद्यावत केले.

मिशन 'सक्षम' अंतर्गत खगोल प्रयोगशाळा तसेच ८ विज्ञान उद्यानांची उभारणी

जिवनोन्नती अंतर्गत बचतगटांसाठी १० विशेष मॉलची उभारणी

ग्रामसडक अंतर्गत ५००० किमी रस्ते बांधणी

ग्रामीण भागात पर्यटन विकास कार्य तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी १६ कृषी माल गोदामांची उभारणी

पुरस्कार– उल्लेखनीय कार्याबद्दल शासनाच्या बालस्नेही पुरस्काराचे मानकरी

लोकाभिमूख कार्याबद्दल 'महाराट्रीयन ऑफ द इअर २०२३' पुरस्काराने गौरव

ग्रामीण जीवनात, अर्थव्यवस्था आणि मुलभूत सुविधा उभारणीसाठी 'स्कॉच पुरस्कार'

पान १/४ वरून पुढे...

## मध्यप्रदेश आणि....

मागणी बीडमधील जैन बांधवांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यामार्फत शासनाकडे केली आहे.

मध्यप्रदेश येथे जैन मुनींना झालेल्या मारहाणीचा व मुंबई विलेपार्ले येथील जैन मंदिर महापालिकेने पाडलेल्या घटनेचा बीडमधील जैन बांधवांकडून जाहीर निषेध करण्यात आला आहे. या दोन्ही घटना जैन समुदायासाठी अत्यंत खेदजनक आहेत. त्याअनुषंगानेच मध्यप्रदेश येथे जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच मुंबई महापालिका अधिकार्यांनी विलेपार्ले येथील ३० वर्षांपुर्वीचे जैन मंदिर पाडून तेथील मंदिरातील मुर्तीची विटंबना केली आहे, सदरील विटंबना करण्यात येणार्या सर्व अधिकार्यांना निलंबित करावे, त्यांची चौकशी करून त्यांना बडतर्फ करावे, महाराष्ट्र शासनाने ही बाब गंभीरतेने घ्यावी, तसेच तेथील जैन मंदिर पुन्हा उभारण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी श्री. ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेस आणि सकल जैन समाज बीडच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना गुरूवारी लेखी स्वरूपात निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर दै. लोकाशाचे संपादक विजयराज बंब, अशोक लोढा, ललित अब्बड, मदन दुग्गड, सुशिल खिवंसरा, चेतन अब्बड, गौतम खटोड, अनिल काला, आशिष जैन, उज्वल कोटेचा, किशोर पगारीया, सुभाष जैन, संजय जैन, नरेंद्र महाजन, सतिष कोटेचा.

## धनंजय मुंडे...

दुपारी दोन वाजता जितेंद्र ओमासे, रघु नागरगोजे, नेताजी ओमासे, मल्हारी खाडे, स्वप्निल साबळे हे सर्वजण बेकायदा जमाव जमवून राहुल ओमासे यांच्या शेतात गेले.

जमीन ताब्यात घेण्यासाठी राहुल यांना झोपडीतून घराबाहेर काढून त्यांची झोपडी पाडून नुकसान केले. यावेळी राहुल यांचे वडील सुरेश यांना मारहाण करण्यात आली. राहुल व त्यांच्या आईला शिवीगाळ केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी मिरज ग्रामीण पोलिसात जितेंद्र ओमासे यांच्यासह चार साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहितान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संशयितांना अद्याप अटक केली नसल्याचे तपास अधिकारी, उपनिरीक्षक दीपक माने यांनी सांगितले.

## परळी हुण...

स्टेशन परळी शहर गु.र.नं. १७६/२०२४ क. ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदरची बाब गंभीरतेने घेवून मा. पोलीस अधीक्षक साहेब, बीड यांनी वरील घटनेतील आरोपीना तात्काळ जेरबंद करुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. सदर गुन्हयाचे अनुषंगाने पो. नि. स्था.गु.शा., बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. चे पथकाने घटनास्थळी भेट देवून आरोपी व गेलामालाचा शोध घेत असतांना मा. पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा १) शालनवाई लक्ष्मण जाधव वय ५८ वर्ष २) केसरबाई सुखदेव जाधव वय ५३ वर्ष दोन्ही रा. गांधीनगर, पेठ बीड ता. जि. बीड यांनी गुन्हा केलेला आहे व त्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाळवंडी नाका, बीड ताब्यात घेवून त्यांचेकडून गुन्हयातील गेला मुद्देमाल १) दोन तोळयाचे सोन्याचे गंठण २) अडीच तोळे वजनाची सोन्याची चैन असे एकुण साडेचार तोळे किंमती २,६५,०००/– रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदर महिला आरोपी नामे १) शालनवाई लक्ष्मण जाधव वय ५८ वर्ष २) केसरबाई सुखदेव जाधव वय ५३ वर्ष दोन्ही रा. गांधीनगर,

पान १/४ वरून पुढे...

पेठ बीड ता.जि. बीड यांना पुढील तपासकामी पो. स्टे. परळी शहर यांचे ताब्यात दिले आहे. पुढील तपास पो. स्टे. परळी शहर वेथील पोलीस अधिकारी व अमंलदार करीत आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, व मा. पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप–नि. सुशांत सुतळे, पोह मारुती कांबळे, पोह बाळकृष्ण जायभाये, पोह विकास राठोड, मपोह सुशिला हजारे, मपोह स्वाती मुंडे, पोकों नारायण कोरडे, पोकों सचिन आंधळे, चापोह नितीन वडमारे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

## धारूर तालुक्यात...

किल्ले धारूर शहरात व तालुक्यात मोठ्या प्रमाणात चोरीचे प्रमाण वाढले असून धारूर तालुक्यातील असरडोह येथे दिनांक २३ एप्रिल रोजी सर्जेराव खडके यांच्या घरी चोरी झाल्याचा प्रकार समोर आला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की सर्जेराव खडके हे शेतामध्ये वास्तव्यस असतात गावात राहणाऱ्या त्यांच्या १४ वर्षीय त्यांचा पुतण्याचा अल्पशा आजाराने मृत्यू झाल्यानंतर २३ एप्रिल रोजी संध्याकाळी ते गावातील त्यांच्या भावाच्या घरी आले असता त्याच रात्री शेतामध्ये शेतातील घरी असलेल्या वयस्कर सासरे असल्याचा फायदा घेत मध्यरात्री अज्ञात चोरांनी त्या वयोवृद्ध सासरे अश्रुबा काळे यांना मारहाण करून नगदी पैसे व सोन्याची चोरी केल्याची घटना घडली आहे. यामुळे धारूर शहर व तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले एकापाठोपाठ घडणाऱ्या चोरीच्या घटना थांबवणे व चोरांच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान पोलीस प्रशासना समोर आहे चोरीच्या घटनांना पायबंद घालून कायदा ,सुव्यवस्था व नागरिकांची सुरक्षा यांना प्राथमिकता देऊन नागरिकांतून भीतीचे सावट दूर करण्यासाठी आव्हान पोलिसासमोर आहे.वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलिस प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे चोरीच्या घटनांचा तपास गतिमान करून चोरांच्या बंदोबस्त करून भितीमुक्त वातावरण निर्माण करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

## कला केंद्राच्या...

केंद्रात सुरू असलेल्या कारभाराचा भंडाफोड केला. दमानिया यांनी या कला केंद्रातील ४ व्हिडिओ शेअर केले आहेत. यामध्ये कला केंद्रात काम करणाऱ्या महिलांना अनैतिक कृत्यांमध्ये गुंतवून वेश्याव्यवसायाला चालना देण्यात सक्रियपणे सहभागी असल्याचे आढळून आल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे पुरावे दिले होते, अशी माहिती दमानिया यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये दिली आहे.

अंजली दमानिया यांनी पोस्ट काय ? बीड जिल्ह्यात, कला केंद्राच्या नावाखाली वेश्याव्यवसाय रॅकेट चालू होते. त्याचे पुरावे मी मुख्यमंत्र्यांना (गृहमंत्र्यांना) आणि गृहराज्य मंत्री योगेश कदम यांना पाठवून छापा मारण्याची विनंती केली. २०२३ मध्ये हे कला केंद्र उबाटा गटाच्या रत्नाकर शिंदे ह्यांचे होते. जुलै २०२३ ला देखील ह्या कलाकेंद्रावर पोलिसांची रेड झाली होती. काल २३ एप्रिल रोजी मध्यरात्री बीड पोलिसांनी केज तालुक्यातील उमरी शिवारातील महालक्ष्मी कला केंद्रावर छापा टाकला. या छापेमारी दरम्यान,

## देशमुख हत्या...

सुनावणी ७ मेपर्यंत स्थगित केली.

या संक्षिप्त सुनावणीनंतर वाल्मीक कराडचे वकील विकास खाडे यांनी या प्रकरणी आरोप निश्चित करण्याची वेळ अद्याप आली नसल्याचे

पान १/४ वरून पुढे...

स्पष्ट केले. चार्ज फ्रेम करण्याची स्टेज अजून आली नाही. प्रथम डिस्चार्ज अर्जावर सर्व पक्षांचा युक्तिवाद होईल. त्यानंतर कोर्ट आपला निर्णय देईल. तद्नंतर आरोप निश्चितीची प्रक्रिया सुरू होईल, असे ते म्हणाले.

अनेक दस्तावेज अद्याप आरोपींना मिळाले नाहीत

ते पुढे म्हणाले, प्रस्तुत प्रकरणातील दोषारोपपत्राशी संबंधित काही दस्तावेज व डिजिटल पुरावे अद्याप सर्व आरोपींना मिळाले नाहीत. काही आरोपींचे जबाब सादर झालेत. पण इतरांच्या जबाबांची अद्याप प्रतीक्षा आहे. त्यामुळे कोर्टाने आजची सुनावणी स्थगित केली. विशेष म्हणजे प्रथमदर्शनी आमचा या प्रकरणात कुठेही सहभाग दिसून येत नाही असा युक्तिवाद आम्ही कोर्टात केला. त्यावर दोषारोपपत्रातील पुराव्यांच्या आधारावर सरकारी वकिलांनी आपली बाजू मांडली. त्यात काय पुरावे गोळा केले व काय म्हणणे सादर केले हे युक्तिवादातून समोर येईल. दरम्यान, आजच्या सुनावणीत विष्णू चाटेला बीड कारागृहात हलवण्याच्या मागणीवर आज सुनावणी झाली. त्यावर कारागृह अधीक्षक व सरकारी पक्षाने आपले म्हणणे कोर्टापुढे सादर केले. या प्रकरणी आता न्यायालयाच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे.

## जागतिक पुस्तक...

सहकार्य व बळावर संपूर्ण वर्षभर आयोजित करण्याचे ठरवण्यात आले आहे. या उपक्रमाच्या प्रारंभी प्राध्यापक सविता बुरांडे,(स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय ,अंबाजोगाई) यांनी प्रसिद्ध लेखिका लिला पाटील यांच्या ऐलमा पैलमा शिक्षण देवा या पुस्तकावर सारांश रूपात भाष्य केले. तर श्रीमती शितल बोधले, (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रविवार पेठ) यांनी संदीप वाकचौरे लिखित सर्जनाची वाट या पुस्तकावर सारांश रूपात भाष्य केले. दोन्हीही शिक्षक वाचकांनी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने या पुस्तकाचा उपयोग शिक्षण पद्धतीत व अध्यापनात कसा करता येईल याची मांडणी केली. याप्रसंगी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था मुरुड जिल्हा लातूर येथील अधिव्याख्याता डॉ. राजेश गोरे यांनी उपस्थितांना आपल्या खुमासदार शैलीत आपल्या दैनंदिन जीवनात वाचनाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

## बुद्ध, कबीर, शिव...

आणि संत तुकाराम महाराज यानी तथगतगौतम बुद्ध यांना गुरु मानलं या महामंवानी वंचित, शोषित, पीडित, लोकांना अंधश्रद्धा, धार्मिक रूढी परंपरा, गुलामीतून बाहेर काढायसाठी संपूर्ण आयुष्य समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी कार्य केले व अज्ञानातून बाहेर पडण्यासाठी फुलेनी अस्पृष्य व महिलांसाठी शाळा काढल्या व छत्रपती शाहू महाराजांनी मुलांना सक्तीचे शिक्षण दिले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून मोफत शिक्षण व मूलभूत हक्क मिळवून दिले, या महामंवानी जातील कधीच महत्व दिले नाही त्यानी माणसाला माणूस पुढे घेऊन जाण्यासाठी कार्य केलेले आहे,

आपण सर्वांनी या महामानवाचे वैचारिक वारसदार व्हा असे मत मांडले त्या नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष डीजी वानखेडे व प्रमुख पाहुणे डी एम. राऊत व सर्जेराव मस्के सर , अध्यक्ष अमर गायकवाड, सचिव सुमेध सरवदे यांच्या हस्ते चित्रकला, रांगोळी, सामान्य ज्ञान, नृत्य स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले, या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ड तेजस वडमारे यानी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अमर गायकवाड, सचिव सुमेध सरवदे, रोहन ससाणे, तेजस खरात,अशोक जावळे, आनंद खेमाडे,सोमेश हिवराळे अभय गायसामुद्रे सारंग जावळे, निशांत पवार, किरण जगदणे यांनी मेहनत घेतली या कार्यक्रमास परिसरातील सर्व बौध्द उपासक उपासिका बालक बालिका यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महत्वाचे

### पहलगाम हल्ल्याचा दुखवटा म्हणून बीड येथील भीम गीतांचा कार्यक्रम रद्द

**भारतरत्न डॉ. आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीचा निर्णय**

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूद्ध वनकर यांचा कार्यक्रम दि.२५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतु पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिकांचा दुर्दैवी मृत्यु झालेला आहे. याचा दुखवटाम्हणून जयंती उत्सव समितीकडून भीमगीतांचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, म हामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे साजरी केली जाते. याहीवर्षी आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ एप्रिल २०२५ रोजी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूध्द वनकर यांचा भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु जम्मू काश्म ीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भारतातील विविध भागांतून पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांवर भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात अनेक निष्पाप लोकांचे जीव गेले. ही घटना अत्यंत दु:खद आहे. त्यामुळे बीड येथील भीमगीतांचा नियोजित कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीकडून घेण्यात आला आहे.

# यूपीएससी परीक्षेतील यशाबद्द डॉक्टर सुशील सूर्यकांत गीते यांचा कुटुंबीयां समवेत सत्कार

**• शिवसेना बीड जिल्हा संघटक भैया धांडे यांचा पुढाकार**

**बीड । प्रतिनिधी**



यूपीएससी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून बीड जिल्ह्यातील तरुणांनी बीड जिल्ह्याचे नाव हिंदुस्थानच्या पटलावरती उत्तम यशाचा झेंडा फडकवला आहे यामध्ये बीड विधानसभा कार्यक्षेत्रातील डॉक्टर सुशील सूर्यकांत गीते यांच्या समवेत आई-वडिलांचाही सत्कार करण्यात आला, अखंड हिंदुस्तान मधून ६२३ वा रँक मिळवल्याबद्दल बीड जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील व जिल्हातील विधी तज्ञांच्या व बीड जिल्हा शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीम ध्ये व शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्या निवासस्थानी सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी जीवन ज्योत हॉस्पिटलचे डॉक्टर अनिल सानप, स्पंदन हॉस्पिटलचे डॉक्टर राम तिडके सर, साईबाबा हॉस्पिटलचे डॉक्टर प्रशांत सानप, जिल्हा न्यायालयाचे सदस्य अँड. लक्ष्मीनारायण काकडे,अरुण पटाईत, धांडे परिवार ज्येष्ठ सदस्य विलास अण्णा धांडे, डॉक्टर संजय जानवळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न झाला यावेळी डॉक्टर सुशील गीते यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. माजी बीड जिल्हा शल्यचिकित्सक सूर्यकांत गीते यांना तीन मुले आहेत यापैकी डॉक्टर स्नेहा गीते २०१९ साली यूपीएससी ३३१ वा रँक मिळवा व सध्या नॉर्थ गोवा या ठिकाणी जिल्हाधिकारी आहेत,सुमित गीते पुणे येथे इंजिनियर आहे बहिणीने चांगल्या अनमोल असे मार्गदर्शन व बारा तास अभ्यास केल्यामुळे यश प्राप्त झाले असे डॉक्टर सुशील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.गीते परिवाराच्या या दोन आयपीएस अधिकाऱ्यामुळे बीड जिल्ह्याचा यशाचा झेंडा हिंदुस्तानच्या नकाशा वरती फडकला याबद्दल बीड शहरातील नागरिकांच्या वतीने सत्कार सोहळा संपन्न झाला करण्यात आला यावेळी प्रसिद्ध उद्योगपती सतीश जाधव, डी मार्ट चे संचालक गणेश किनीवाडकर, बंटीसेट मचाले, प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू आगाखान पठाण, शिक्षक नेते संजय वाघुले, वायकर सर, पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष सोमनाथ धांडे, युवा उद्योजक पंकज धांडे, सरपंच शरद झोडगे, उपतालुकाप्रमुख शिवाजी तीपाले, सौ.सुधारणा धांडे, सौ अंजलीताई गोरे, डॉक्टर सौ.अश्विनी पाटील, सौ.डॉक्टर पूजा धांडे, गौरव गोरे, ओवी पाटील, बबलू तिपाले, रियांश पाटील यांच्यासह बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक डॉक्टर इंजिनिअर, वकील, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रंगोत्सव स्पर्धेत चंद्रभागा पोद्दार लर्निंग स्कूलचे सुयश



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

रंगोत्सव सेलिब्रेशन मुंबई आयोजित रंगोत्सव स्पर्धेत माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील चंद्रभागा पोद्दार लर्निंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यांचा गुणगौरव सोहळ्याच्या आयोजन गुरुवारी करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच अंगी असलेला कला विकसित व्हाव्या या उद्देशाने मुंबईतील रंगोत्सव सेलिब्रेशन च्या वतीने फेब्रुवारी महिन्यात रंगोत्सव स्पर्धेचे आयोजन देशपातळीवर करण्यात आले होते. या स्पर्धेत प्री प्रायमरी व इयत्ता १ली ते ८ वी या दोन गटात विद्यार्थ्यांच्या चित्रकला,हस्तकला स्पर्धेची परीक्षा झाली होती. या परीक्षेत चंद्रभागा पोद्दार लर्निंग स्कूलच्या ५४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. २७ विद्यार्थ्यांनी प्रथम, ६ विद्यार्थ्यांनी विशेष सहभाग, व २१ विद्यार्थ्यांनी प्रोत्साहन पर बक्षीस मिळवली. या सर्व विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन गुरुवारी सकाळी करण्यात आले होते. याप्रसंगी दिंद्रुड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, मुख्याध्यापक मनोहर कटारे, यांच्यासह शाळेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल ठोंबरे,प्राचार्य निलेश निंदाने, मुख्याध्यापिका अमृता गुळवे, कलाशिक्षक सारंग मगर, राजेंद्र पांडे, शालिक बोडखे, बाळू घुगे, आशिष लाखे, अमोल दळवे आदींची उपस्थिती होती.

# भीमज्योती जन्मोत्सवात: ऑर्केस्ट्राचा थरार अन् सळसळती तरुणाई!

**संपला नाही अन् संपणार नाही शितलताईचा दरारा गाण्यांवर तरुणाई थिरकली , धोंडराईच्या भिमचाहत्यांची गर्दी**

**गेवराई । प्रतिनिधी**

आले किती गेले कितीउडून गेला भरारा... कधी संपला नाही अन् संपणार नाहीशितलताईचा दरारा अशा तरुणाईच्या हृदयावर छाप टाकणाऱ्यां एकापेक्षा एक गाण्यावर तरुणाई बेभान होऊन नाचत होती. त्याने आपल्या आवाजात सादर केलेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील ''भिमगिते '''ओ भिमवाले' कुंकू लावील रमानं तसेच '' 'जिथे गाव तिथे भीमराव' भीमराव आणि रमाईच्या आठवणींची या गाण्यांनी तर तरुणाई मैदान डोक्यावर घेतले. भीमज्योती जयंती उत्सव हजारो चाहत्यांच्या गर्दीने हाऊसफुल्ल ठरला. सविस्तर वृत्त असे की क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची





संयुक्त जयंती २३ मार्च रोजी सायंकाळी सात वाजता धोंडराई गावात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी येथील बुद्धविहारामध्ये सामुदायिक बुद्धवंदना, प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली.यावेळी ठिकठिकाणी माझा भीमराव लय दिलदार तुला फुकट दिले सार, उद्धारले बहुजन भिमा तुम्हामुळे या भीम गीतांमुळे गावात वातावरण भारावून गेले होते. तरुणाईने ऑर्केस्ट्राच्या तालावर ठेका धरत जल्लोष केला यावर अख्खी तरुणाई थिरकली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी भीमसागर उसळला होता. अभिवादन करण्यासाठी विविध जाती धर्माचे नागरिक राजकीय पुढारी पक्ष संघटनाच्या कार्यकर्त्यांनी सकाळपासून गर्दी केली होती. दरम्यान ठीक ठिकाणी आरोग्य तपासणी रक्तदान शिबिरे फळवाटप पाणी वाटप यांसह विविध उपक्रम राबविण्यात आले होतें.

## निरगुडी येथे होणाऱ्या भव्य "संत सावता महाराज मंदिर भूमिपूजन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - हनुमान भैय्या शेलार

**पाटोदा । प्रतिनिधी**

श्रद्धा, संत परंपरेवरील निष्ठा आणि भक्तीचा पवित्र संगम साकार करणारा श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर भूमिपूजन सोहळा दिनांक २६ एप्रिल २०२५, शनिवार, सकाळी १० वाजता निरगुडी येथे उत्साहात पार पडणार आहे.या पवित्र भूमिपूजन सोहळ्याचे शुभहस्ते होतील -ह.भ.प. वसेकर महाराज (श्री क्षेत्र संत सावता महाराज संस्थान, अरण, ता. माढा, जि. सोलापूर), कार्यक्रमाचे अध्यक्ष: आमदार सुरेश (आण्णा) धस,(आष्टी,पाटोदा, शिरुर) विशेष उपस्थिती: आमदार योगेश (आण्णा) टिळेकर,(विधान परिषद सदस्य - पुणे) प्रमुख पाहुणे माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे आणि आध्यात्मिक संत मंडळींची मांदियाळी या सोहळ्यात राजकीय, आध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, महंत ह.भ.प.राम कृष्ण रंधवे बापू.ह.भ.प राधाताई महाराज सानप,ह.भ.प. शिवाजी येवले,रामदास महाराज,भगवान महाराज, भक्तीदास महाराज शिंदे, अमृत जोशी महाराज यांसह अनेक संत मंडळी आणि स्थानिक नेते मंडळींचा सहभाग लाभणार आहे. तसेच या सोहळ्यात गावातील यशस्वी युवा अधिकारी व पोलिस सेवेतील नविन भरती झालेल्यांचा सन्मान वरील सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे

# चौसाळा महाविद्यालयात पोषण पखवाडा समारोप

**चौसाळा । प्रतिनिधी**



कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे ग्रहशास्त्र विभाग व महिला कक्ष यांच्या तर्फे १५ एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान पोषण पखवाडा चे आयोजन केले होते. समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे यांनी पोषण युक्त आहाराचे महत्व विषद करून आजच्या काळात सकस आहार घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. उपप्राचार्य गणपती ढवळशंख यांनी कडधान्याचे महत्व या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. सय्यद शाहीन म्हणाल्या की, या पोषण पखवाड्यात आपण फळभाजी, पालेभाजी,कडधान्य यांची रांगोळी स्पर्धा घेतली , पोषण पाककृती स्पर्धा आयोजित केली. गर्भवती महिलांना सकस आहार व लसीकरण यांचे महत्व पटवून दिले, ग्रामीण भागातील महिलांना सकस आहार व संसर्गजन्य रोग यावर मार्गदर्शन केले. असे विविध कार्यक्रम घेतले आहेत. या समारोपाच्या कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन प्रा. पवार सीमा यांनी केले. या वेळी विध्यार्थिनी, प्राध्यापक कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते

## वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री महायज्ञ संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड येथे दिनांक २४/४/२०२५ रोजी वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री महायज्ञ संपन्न झाला.मंदिराचे अध्यक्ष ड मंगेश पोकळे सर यांच्या म ार्गदर्शनाखाली व गायत्री परिवार बीड कडून आयोजित प्रत्येक एकादशी निमित्त व चतुर्थी निमित्त यज्ञ आयोजित केले जातात या नियमाने आज वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री यज्ञ संपन्न झाला. यामध्ये आजचे यज्ञाचे यजमान गायत्री परिवाराचे बीडजिल्हा सम न्वयक मोहन म.खरमाटे सहपरिवार होते तर यज्ञाचे पौरोहित्य रत्नपारखी महाराज व सौ मीनाक्षी गायकवाड यांनी केले. यज्ञाच्या पूर्ण आहुतीनंतर पहलगाम येथे झालेल्या हिंसाचारात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप बांधवां साठी श्रद्धांजली अर्पण केली, यावेळी श्री मुकुंद भुतपल्ले, विलास लेंभे, मुंडे, दुधाळ,मेहत्रे, जाधव, महावीर बोरा साईनाथ दुधाळ,,, बडे, पोकळे परिवार, परदेशी, पोकळे काकू, चंपावतीपत्र चे पत्रकार महादेव साळुंके हजर होते.

# 48 तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश; सीमा हैदरचं आता काय होणार?

**वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने कठोर भूमिका घेत पाकिस्तानवर कायदेशीवर स्ट्राईक लावला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पाकिस्तानविरोधात ५ मोठे निर्णय घेण्यात आलेत.

त्यात भारत सरकारने पाकिस्तानी नागरिकांना दिलेला व्हिसा रद्द केला असून भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश दिलेत. जे व्हिसा धारक आहेत त्यांना १ मे पर्यंत पाकिस्तानात जाता येणार आहे. भारत सरकारच्या या आदेशानंतर सर्वात जास्त चर्चा पाकिस्तानातून भारतात आलेल्या



सीमा हैदर या महिलेची होत आहे. सीमा हैदर भारतीय नागरिक सचिन मीणाच्या प्रेमात पडून पाकिस्तानसोडून भारतात आली होती. इथे तिने सचिनसोबत लग्न केले. आता भारत सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे सीमा हैदरला पुन्हा पाकिस्तानात परतावं लागणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे. नेपाळमार्गे भारतात आली होती. सीमा हैदर नेपाळमार्गे भारतात आली होती. सर्वात आधी ती पर्यटक व्हिसा घेऊन पाकिस्तानच्या शारजहातून नेपाळला पोहचली. नेपाळमध्ये काही दिवस घालवल्यानंतर काठमांडू टू दिल्ली बसमध्ये प्रवास करत ती चार मुलांसह भारतात पोहचली. याठिकाणी सीमा हैदरने सचिन मीणासोबत लग्न केले तेव्हापासून सीमा हैदर भारतात राहत आहे. सीमा आणि सचिन यांची याआधी यूपी एटीएसने चौकशी केली आहे..

पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश सरकारने दिल्यानंतर सीमा हैदरताही परत जावे लागणार का हे येणाऱ्या काळात कळेल. सीमा हैदर भारतात कुठल्याही व्हिसा आणि पासपोर्टशिवाय पोहचली होती. तिचे प्रकरण अद्याप कोर्टात प्रलंबित आहे. सीमा हैदरने भारतीय नागरिक सचिन मीणासोबत लग्न केले आहे. जर यूपी सरकार या प्रकरणी सीमा हैदरविरोधात गुन्हा दाखल करून तिला विना व्हिसा, पासपोर्ट भारतात आल्याबद्दल शिक्षा होऊ शकते अथवा तिला पुन्हा पाकिस्तानात सोडले जाऊ शकते. सीमा हैदरने भारतीय नागरिकत्व मिळावे अशी मागणीही केली आहे.

दिल्ली हायकोर्टाचे वकील अबू बकर यांनी सांगितले की, सर्व पाकिस्तानी नागरिकांना कुठल्याही स्थितीत भारत सोडावा लागेल. त्यामुळे सीमा हैदरलाही भारतातून जावे लागेल. परंतु हे करणे सोपे नाही. सीमा हैदरला भारतात राहण्याची परवानगी द्यायची की नाही हे राज्य सरकारवर अवलंबून आहे. सीमा हैदरने भारतीय नागरिकाशी लग्न केले आहे. सचिन मीणाशी लग्न करून तिला १ मुलगाही झाला आहे. त्यामुळे यूपी सरकारच्या रिपोर्टवर सीमा हैदरवर कारवाई होणार की नाही हे स्पष्ट होईल.

## मोबाईल ॲप द्वारे १०० टक्के ई पीक पाहणी पूर्ण करण्याच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

राज्यातील सर्व गावांमध्ये उन्हाळी हंगाम २०२५ सुरू करण्यात येत आहे या प्रकल्पात शेतकरी स्तरावरून व सहाय्यक स्तरावरून मोबाईल ॲप द्वारे पिकाची नोंदणी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. शेतकरी स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १ एप्रिल २०२५ ते १५ मे २०२५. सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १६ मे २०२५ ते २९ जुन २०२५ उन्हाळी हंगाम २०२५ ची १०० टक्के ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲप द्वारे पूर्ण करावयाची आहे. दिनांक २२. ४. २०२५ च्या दैनिक अहवालाच्या अवलोकन केले असता ०.०८ टक्के क्षेत्राची पीक नोंदणी झाल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने दिलेल्या सूचनाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करून उन्हाळी हंगाम २०२५ ची शेतकरी व सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व (DCS) मोबाईल प द्वारे विहित कालावधी १०० टक्के पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत.




*समृद्धी महिला शेतकरी गटाचे अध्यक्ष मंगल रामप्रसाद डोईफोडे यांची आज दिनांक २५ एप्रिल शुक्रवार रोजी अकरा वाजता महिला विश्व या कार्यक्रमांमध्ये बीड आकाशवाणीवर मुलाखत आहे या शेतीविषयक माहितीचा सर्व शेतकरी बांधवांनी श्रवणाचा लाभ घ्यावा असे आव्हान मौजे ईट येथील शेतकरी गटाचे अध्यक्ष रामप्रसाद डोईफोडे यांनी केले आहे.*



*बीड जिल्हाभरात सायंकाळी साडेचार ते साडे सात या दरम्यान मोटर वाहतूक कायद्यानुसार कारवाया करण्याकरिता माननीय पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर यांच्या आदेशाने माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर सर व श्रीमती तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कवच नाकाबंदी करण्यात आली .सदर नाकाबंदी करिता सर्व पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी अंमलदार नेमण्यात आले होते .सदर कारवाईदरम्यान बाराशे एक चलन चे नऊ लाख ७३ हजार ५५० रुपये वसूल करण्यात आले असून तसेच ३०७ नव्याने केसेस करण्यात आलेले आहेत .त्याचा दोन लाख २३ हजार ७५० दंड आकारण्यात आलेला आहे. सदर नाकाबंदी पाडळसिंगी टोल नाका, पांगर बावडी ब्रिज, केज टोल नाका, धारूर टोल नाका, अंबाजोगाई टोल नाका, चुंबळी फाटा, अंभोरा चेक पोस्ट, इतके कॉर्नर परळी ,परभणी टी पॉइंट माजलगाव, या ठिकाणी नेमण्यात आलेली होती.*

### थोडक्यात

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त शिक्षकांसाठी शिक्षक वाचन या अभिनव उपक्रमाची सुरुवात



### शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या वतीने संयुक्त उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिध

जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई जिल्हा बीड व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी शिक्षक वाचन हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला. यामध्ये शिक्षण विषयक पुस्तकांचा अभ्यास करून त्याचे सारांश रूप इतर शिक्षकांसमोर मांडणी करणे व त्याचा आपल्या शालेय व्यवस्थापनात व दैनंदिन अध्यापनात कसा उपयोग होईल याबाबत सविस्तर विवेचन करणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. हा अभिनव उपक्रम जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई चे जेष्ठ अधिव्याख्याता डॉ योगेश सुरवसे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आला आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता डॉ. योगेश सुरवसे व प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ त्याचबरोबर शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या अनमोल ▶▶ उर्वरित पान २ वर

# पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे निदर्शने

लिंबागणेश । प्रतिनिधी

जम्मू -काश्मिरच्या पहलगाम मधील मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखले जाणारे बैसरण खोरे येथील निसर्गरम्य परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक धार्जिणे अतिरेक्यांनी बेछुटपणे गोळीबार करत हल्ला केला.या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक मृत्युमुखी पडले असुन अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर देशभर पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर



यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२४ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.यावेळी हिंदू -मुस्लिम भाई भाई म्हणत पाकिस्तान मुर्दाबाद हल्लेखोरांना फाशी द्या पाकिस्तान विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हल्लेखोर आणि त्यामागील सुत्रधार यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली. भारत सरकारने पाकिस्तान विरोधात घेतलेल्या सिंधू पाणी वाटप करार रद्द,अटारी सिमेवरील तपास नाका बंद, पाकिस्तानी नागरीकांना व्हिसा नाही, उच्चायुक्तालयातील लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागार पदे रिक्त आदी निर्णयांचे स्वागत करण्यात आले.यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, अँड . गणेश वाणी,अशोकराजे वाणी ,महादेव कुदळे,शेख शफीभाऊ, समीर शेख,कैलास काटे, बालाजी निर्मळ,शंकर निर्मळ, हरिओम क्षीरसागर, सुरेश निर्मळ,कचरू रणखांब, अमोल वक्ते, भगवान मोरे,आश्रुबा गिरे, संतोष भोसले, नाना वाणी, जनार्दन वाणी, राजेंद्र वायभट आदी ग्रामस्थ सहभागी होते.




*महाराष्ट्र विधानमंडळ (विधानपरिषद) आश्वासन समितीच्या अध्यक्ष पदी भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना एकनाथ कदम सरपंच राम जाधव.*

## नगर परिषदेने उन्हाळ्यात पाणी लवकर सोडावे;
## मतदारांनी अशा बाबींची नोंद ठेवावी - ॲड. अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

सध्या कडाक्याचे ऊन आहे. त्यामुळे पाणी भरपूर लागते. अशा परिस्थितीत बावीस दिवसापेक्षा जास्त कालावधीपासून बीड शहरात पाणी नाही. त्यामुळे नगर परिषदेने पाण्याचे योग्य नियोजन लावून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी. सुविधा पुरवणे, हे नगर परिषदेचे काम आहे. त्यात कोणताही उपकार नाही. त्यामुळे पाणी वेळेवर सोडावे. मतदारांनी अशा बाबी लक्षात ठेवाव्यात, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.



माजलगाव आणि पाली येथून बीडला पाणी येते. माजलगाव कडून येणाऱ्या पाईप लाईनच्या दुरुस्तीमुळे अनेक दिवस पाणी नव्हते. दुरुस्तीचे नियोजन हे अगोदरच करणे आवश्यक होते. मात्र ऐन कडक उन्हाळ्यात पाईप लाईन दुरुस्तीचे काम काढणे चुकीचे आहे. देखरेख करणे हे सातत्यपूर्ण काम आहे. त्यामुळे कुठला पाईप खराब होत आहे, हे नगर पालिकेला अगोदरच माहीत असणे आवश्यक असते. मात्र नियोजनाचा अभाव असलेल्या बीड नगर परिषदेने जनतेची कुचंबना चालवली आहे. कडक उन्हाळ्यात बावीस दिवसापेक्षा जास्त कालावधीनंतर पाणी मिळत असेल, तर नागरिकांनी पाण्यासाठी कोणते नियोजन करावे, याचे उत्तर देखील नगर पालिकेने दिले पाहिजे.

नगर परिषद हद्दीतील जनता नगर पालिकेला सातत्याने टॅक्स देत असते. जर जनता टॅक्स देत नसेल तर तो वसूल करण्याची जबाबदारी देखील पालिकेची आहे. मात्र या सर्वांकडे कानाडोळा करून नगर पालिका चुकीच्या पद्धतीने चालत असेल, तर दोषींवर कारवाई व्हायला हवी. त्यामुळे नगर पालिकेने नागरिकांना आवश्यक तेवढे पाणी पुरवावे. आठ दिवसाला पाणी सोडावे, असे आवाहन देखील देशमुख यांनी केले आहे.

### मॉर्निंग वॉक करताना तहसील कर्मचाऱ्याचे अपघाती निधन

केज । प्रतिनिधी

सकाळी 'मॉर्निंग वॉक' साठी घराबाहेर पडलेल्या ट्रक चालकाने चिरडल्याने घडलेल्या अपघातात तहसील कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना सकाळी शहरात सकाळी घडली आहे. भास्कर हजारे असे मयत तहसील कर्मचाऱ्याचे नाव असून ते सकाळी नेहमी प्रमाणे मॉर्निंग वॉक साठी घराबाहेर पडले होते. ते भवानी चौकातून चालत जात असताना एका ट्रकची धडक बसून त्यांना गंभीर मार लागला यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. सदरील ट्रक चालकाला अटक करण्यात आली आहे. या घटनेने केज शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# बुद्ध, कबीर, शिव, फुले, शाहू, आंबेडकर, साठे यांच्या विचाराचे वारसदार व्हा :डॉ. मनोहर सिरसाट

बीड । प्रतिनिधी

पंचशील नगर बीड येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त आयोजित पंचशील मोहत्सवा मध्ये २३/०४/२०२५ रोजी प्रा. डॉ. मनोहर सिरसाट सर यांचे व्याख्यान त्रिरत्न बुद्ध विहार पंचशील नगर बीड येथे आयोजित केले होते व्याख्यानाचा विषय बुद्ध शिव फुले शाहू आंबेडकर यांच्यातील वैचारीक साम्य, नियोजन ड तेजस वडमारे व राजेश



मस्के यांनी केले होते या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून डी. जी. वानखेडे व प्रमुख पाहुणे म्हणून डी. एम. राऊत व सर्जेराव मस्के सर. विचार मंच्यावर उपस्थित होते सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते आदर्शाना पुष्प हार मेणबत्ती अगरबत्ती लावून अभिवादन करण्यात आले त्या नंतर डॉ. सिरसाट सर यांनी बुद्ध, कबीर, शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आण्णाभाऊ साठे याच्यातील वैचारिक साम्य सांगितले व पुढे बोलताना प्रा. सिरसाट सर म्हणाले जगबद्दल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव, आण्णाभाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गुरु मानले, डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध,कबीर, फुले यांना गुरु मानले, महात्मा जोतिबा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना गुरु मानलं, छत्रपती शिवाजी महाराजांनी जगतगुरू संत तुकाराम यांना गुरु मानलं ▶▶ उर्वरित पान २ वर

### लोकसहभागातून सूक्ष्म नियोजनमध्ये शालेय विद्यार्थ्यां समवेत जनजागृती प्रभात फेरी

बीड । प्रतिनिधी

चांदेगाव येथे नानासाहेब देशमुख क्रषी संजीवनी प्रकल्प टप्पा २अंतर्गत लोकसहभागातून सूक्ष्म नियोजन मध्ये सकाळी शालेय विद्यार्थ्यांना समवेत जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.मर्दा व जलसंधारण, वृक्ष लागवड पर्यायवरण संवर्धना संबंधी घोषणा विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देऊन गावामध्ये जनजागृती केली यावेळी ग्राम कृषी विकास समिती सदस्य शाळेतील मुख्याध्यापक शाळा व्यवस्थापन समिती, स्वयंसेवक, गावातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी योजनेविषयी हवामान अनुकलतेवर चर्चा केली तसेच नियोजन प्रकिया,शिवार.

